02-09-2022-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 09/01/2022 10:16 PM Page 1



# चतुर्थीच्या काळात सत्तरीत तीव्र पाणीटंचाई!

## वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे दाबोस पाणी प्रकल्पाची यंत्रणा ठप्प

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. १ :** एका बाजूने सत्तरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात गणेशचतुर्थी साजरी करण्यात येत आहे. तर दुसऱ्या बाजूला गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर तालुक्याच्या जवळपास सर्वच भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. यामुळे तमाम गणेश भक्तांमध्ये तीव्र स्वरूपाची खदखद व्यक्त करण्यात येत आहे. गणेश चतुर्थीच्या काळात अशाप्रकारे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणे, ही खरोखर दुर्दैवाची बाब असल्याच्या प्रतिक्रिया गणेशभक्तांनी व्यक्त केल्या आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे समजते. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे दाबोस पाणी प्रकल्पाची यंत्रणा बंद पडली. यदाकदाची याठिकाणी जनरेटरची सेवा असती, तर गणेशचतुर्थीच्या काळामध्ये नागरिकांवर पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निर्माण झाली नसती अशा प्रकारच्या प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

वीज वाहिन्यांवर झाड पडल्यामुळे दाबोस व मासोर्डे भागातील विविध ठिकाणचा वीजपुरवठा खंडित झाला. याचा प्रतिकूल परिणाम दाबोस पाणी प्रकल्पाच्या यंत्रणेवर झाला. त्यामुळे यंत्रणा बंद पडली. बुधवारी दुपारी व गुरुवारी दिवसभर सत्तरी तालुक्याच्या जवळपास सर्वच भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. वाळपई सार्वजनिक पाणीपुरवठा कार्यालयातर्फे अनेक गावांमध्ये टँकर द्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, हा पाणीपुरवठा तोकडा पडल्याचे चित्र पाहावयास मिळाले. यामुळे अनेक गावातील नागरिकांनी शेजारी असलेल्या नदीवरील पाण्याची व्यवस्था करण्यावर भर दिला तर अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.

दरम्यान, या संदर्भात वाळपई सार्वजनिक पाणीपुरवठा कार्यालयाचे दाबोस पाणी प्रकल्पाचे सहाय्यक अभियंता प्रशांत गावडे यांच्याशी संपर्क साधला, असा त्यांनी सांगितले की बुधवारी दुपारी २.३० वाजता वीजपुरवठा खंडित झाला होता. तो रात्री नऊ वाजता पूर्वपदावर आला. मात्र लगेच पुन्हा एकदा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडला. यामुळे पाणी प्रकल्पाची यंत्रणा पूर्णपणे ठप्प झाली. गुरुवारी सकाळी पुन्हा एकदा वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र लगेच पूर्व पदावर आल्यानंतर पाणी प्रकल्पाची यंत्रणा सुरू करण्यात आलेली आहे. मात्र एकदा पाणी प्रकल्पाची यंत्रणा सुरू करण्यात आल्यानंतर तब्बल सहा तासाने विविध पुरवठा पूर्वपदावर येण्यासाठी वेळ लागतो. यामुळे गुरुवारी रात्री उशिरापर्यंत सर्व गावांमध्ये पाणीपुरवठा पूर्व पदावर येण्याची आशा प्रशांत गावडे यांनी व्यक्त केलेली आहे.

दरम्यान, खंडित वीजपुरवठासंदर्भात वाळपई वीज कार्यालयाचे सहाय्यक अभियंता दीपक गावस यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, बुधवारी संध्याकाळी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये वादळी वारा झाला. यामुळे मोठ्या प्रमाणात पडझड झाली. वीज खात्याच्या यंत्रणेची मोठ्या प्रमाणात नुकसानी झालेली आहे. मात्र पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारासंदर्भात स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की मासोर्डे व दाबोस या ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे पडल्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडला. यामुळे दाबोस पाणी प्रकल्पाला विविध पुरवठा करणे शक्य झाले नाही, असे यावेळी त्यांनी सांगितले. मात्र, ज्या ठिकाणी वादळी वारा होऊन विजेची नुकसानी झाली होती, ती गुरुवारी दुपारपर्यंत दुरुस्ती पूर्ण झालेली आहे. यामुळे अनेक ठिकाणी खंडित झालेला वीजपुरवठा पूर्वपदावर आल्याचे दीपक गावस यांनी यावेळी स्पष्ट केले.



**झर्मे : पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या टँकरच्या सभोवताली पाणी भरण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात केलेली गर्दी.**

### जनरेटरची सुविधा नसल्यामुळे समस्या

**दाबोस पाणी प्रकल्पाला जनरेटरची व्यवस्था करा, अशा प्रकारची मागणी करण्यात येत आहे. मात्र, गेल्या दहा वर्षांपासून ही सुविधा उपलब्ध झालेली नाही. या ठिकाणी जनरेटरची व्यवस्था असती, तर गणेश चतुर्थीच्या काळामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली नसती. मात्र, याकडे सरकारची यंत्रणा पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. स्थानिक आमदार विश्वजित राणे यांनी या कामी विशेष लक्ष द्यावे, अशा प्रकारची मागणी पुन्हा एकदा नागरिकांनी प्राधान्याने केलेली आहे. त्याची पूर्तता करण्यात यावी, अशा प्रकारची मागणी नागरिकांनी केलेली आहे.**

## पान १ वरून

### मुख्यमंत्र्यांनी गृहमंत्रिपदाचा त्याग करावा

**कुडचडे बिहारच्या दिशेने : पाटकर**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर म्हणाले की, भाजप गोव्याला अराजक राज्य बनवत आहे. पर्यावरणमंत्री नीलेश काब्राल यांच्यात मतदारसंघात अवैध वाळू उत्खनन सुरु असल्याचे दिसून आले. स्थानिक नेत्याचा आशीर्वाद असल्याशिवाय हे होणे नाही. बंदुकीच्या गोळ्या झाडून कुडचडे आता बिहारमध्ये बदलत आहे. या प्रकरणाबाबत बेकायदेशीर खाणकाम तात्काळ थांबवून दोषींना अटक करण्याची मागणी त्यांनी गोव्याच्या मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# उच्च दाबाच्या वीजपुरवठ्याने सत्तरीत अनेकांचे नुकसान


**अडवई : अनंतराव देसाई यांच्या घरात उच्च दाबाचा वीजपुरवठा झाल्यामुळे घरगुती विद्युत उपकरणांचे झालेले नुकसान.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. २ :** गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर बुधवारी संध्याकाळी मोठ्या प्रमाणात लागलेल्या पावसामुळे व उच्च दाबाचा वीजपुरवठा झाल्यामुळे घरगुती सामानाची मोठ्या प्रमाणात नुकसानी झाल्याची माहिती हाती आली आहे. सत्तरी तालुक्याच्या अनेक भागांमध्ये ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांना फटका बसला असून सरकारने या संदर्भात विशेष दखल घेऊन नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था सरकारने करावी, अशा प्रकारची मागणी तमाम नागरिकांनी केलेली आहे.

बुधवारी गोव्यामध्ये मोठ्या प्रमाणात गणेश चतुर्थीच्या सणाला सुरुवात झाली. सत्तरी तालुक्यात संध्याकाळच्या सत्रात मात्र गडगडाटसह मोठ्या प्रमाणात पाऊस आला. वादळी वारा झाल्यामुळे नैसर्गिक पडझड झाली तर अनेक ठिकाणी शेती बागायतीची नुकसानी झाल्याची माहिती हाती आलेली आहे. दरम्यान सात वाजण्याच्या सुमारास अनेक गावांमध्ये उच्च दाबाचा वीजपुरवठा झाला. यामुळे घरगुती सामानाची व घरातील विविध यंत्रणेची मोठ्या प्रमाणात नुकसानी झाल्याची माहिती हाती आलेली आहे.

अडवई येथील अनंतराव देसाई यांच्या घरात उच्च दाबाचा वीजपुरवठा झाल्यामुळे त्या घरातील वीज यंत्रणेचे नुकसानी झालेली आहे. यामुळे या कटुंबाला मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे. हे कुटुंब आर्थिकदृष्ट्या मागास असून यामुळे या कुटुंबासमोर भविष्याची चिंता निर्माण झालेली आहे. दरम्यान, या संदर्भात या कुटुंबीयांकडून दिलेल्या माहितीनुसार, मोठ्या प्रमाणात गडगडाट सुरू असताना अचानकपणे वीज यंत्रणा जळण्याचे प्रकार घडू लागले. यामुळे कुटुंबामध्ये भीतीचे वातावरण पसरले. विजेच्या यंत्रणेमधून मोठा आवाज येऊ लागला होता. त्यानंतर अनेक ठिकाणी असलेले बटन, बल्ब फुटले व यामुळे नुकसानी झाली. सध्या सदर घरामध्ये काळोखाचे साम्राज्य पसरलेले आहे.

# चतुर्थीत भात कणसांचे पूजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १ :** गणेश चतुर्थी उत्सवात पारंपरिक भात कणसांचे पूजन करण्यात आले. अनेक ठिकाणच्या शेतात अजूनही भात कणसे आलेली नाहीत. शेतात पूर्णपणे भात कणसे उगवण्यास अजूनही साधारण दहा पंधरा दिवस लागतील.

यंदा चतुर्थी लवकर आल्याने भात कणस मिळविण्यास भक्तांना थोडे कठीण झाले. काही भक्तांनी बाजारातून भात कणसे विकत आणली. शिवोली बाजारात भात कणसे ५० रुपयांना विक्रीस उपलब्ध होते. या ठिकाणी नेरुल येथून भात कणसे विक्रीस आणली, अशी माहिती एका महिला विक्रेत्याने दिली.


**आमच्या शेतात भात कणसे उपलब्ध आहेत. गणेशभक्तांची सोय करण्यासाठी आम्ही भात कणसे गणेशभक्तांना मोफत उपलब्ध करून देत आहोत. गणरायाच्या चरणी ही आमची सेवा आहे.**
**- शिवशंकर मयेकर, शेतकरी, हणजूण**


**शिवोली : बाजारात भात कणसांची विक्री करताना महिला.** (जयेश नाईक)

# विनायक कला संघातर्फे गणेशोत्सवानिमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, ता. १ :** बायणा येथील विनायक कला संघाच्या ३६ व्या सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

२ रोजी सकाळी व सायंकाळी आरती व तीर्थप्रसाद. ३ रोजी सायंकाळी सात वाजता युवक बिरादारीतर्फे 'संगीत गीत बहार' करोओके कार्यक्रम. ४ रोजी सकाळी व सायंकाळी आरती व तीर्थप्रसाद. ५ रोजी सायंकाळी श्री सत्यनारायण पुजा व खाप्रेश्वर सांस्कृतिक महिला भजनी मंडळातर्फे भजन. ६ रोजी सायंकाळी साडे सहा वाजता नृत्य स्पर्धा. स्पर्धा दोन गटांमध्ये घेतली जाईल. ज्युनियर गटामध्ये बारा वर्षे वयोगटातील तर सिनियर गटामध्ये बारा वर्षे वयोगटातील मुलामुलींना सहभागी होता येईल. ७ रोजी सायंकाळी साडे सहा वाजता जादुगर शिरिष कुमार यांचे जादुचे प्रयोग. ८ रोजी वेषभुषा स्पर्धा (सब ज्युनियर गट पाच वर्षापर्यंत व ज्युनियर गट बारा वर्षापर्यंत) तसेच मुरगाव व वास्को परिसरात शालांत परीक्षेत प्रथम व व्दितीय आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विविध स्पर्धातील विजेत्यांना बक्षीस देण्यात येतील. ९ रोजी सायंकाळी चार वाजता टाळ मृदुंगाच्या गजरात श्री गणेश मूर्तीची मिरवणूक व बायणा किनाऱ्यावर विसर्जन होईल.

## सहवेदना

### सहदेव नाईक

■ टीम दैनिक हेराल्ड



**कोलवाळ, दि. १ :** मेणकुरे येथील सेवानिवृत्त पोलिस हवालदार तुकाराम ऊर्फ शांताराम अर्जुन नाईक (वय ८४) यांचे बुधवारी अल्प आजाराने निधन झाले. मेणकुरेच्या स्मशानभूमीत आज सकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त संयुक्त लेखा संचालक विनायक व यशवंत यांचे शांताराम हे ज्येष्ठ बंधू होत.


### फिनिक्स टाऊनशीप लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय :दुर्गाभवन, हेदे सेंटर, टोंक, पणजी, गोवा–४०३००१
ईमेल आयडी : complaince@hbgindia.com संकेतस्थळ : www.hbgindia.com
सीआयएन – एल६७१९०जीए१९९३पीएलसी००१३२७
अधिकृत भांडवल – रु. २८,००,००,०००
सदस्यत्व भांडवल आणि भरणा केलेले भांडवल – रु. २१,६८,०८,६८०

**जाहीर सूचना – व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) व इतर दृकश्राव्य पद्धतींद्वारे घेतली जाणारी कंपनीची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, फिनिक्स टाऊनशीप लिमिटेड (कंपनी) या कंपनीच्या सदस्यांची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ५ मे २०२० आणि १३ जानेवारी २०२१ रोजी प्रसिद्ध केलेली सर्वसाधारण परिपत्रके (एमसीए परिपत्रके) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी १२ मे २०२० व १५ जानेवारी २०२१ रोजी प्रसिद्ध केलेली परिपत्रके (सेबी परिपत्रके) यांसह कंपनीज अॅक्ट, २०१३ च्या लागू तरतुदी व त्याखाली तयार केलेले नियमांचे पालन करून सदर एजीएमच्या सूचनेत दिलेल्या कार्यसूचीवर विचारविनिमय करण्यासाठी व सेंट्रल डिपॉझिटरीज सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल) द्वारे पुरविलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) व इतर दृकश्राव्य पद्धतींद्वारे बुधवार २८ सप्टेंबर २०२२ रोजी ठीक दुपारी ३.०० वा. (भा.प्र.वेळ) घेतली जाईल.
कंपनीचे भागधारक, ज्यांचे ईमेल आयडीज कंपनी किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट(पंट्स)कडे नोंदणीकृत केलेले आहेत त्यांना एजीएमची नोटील व आर्थिक वर्ष २०२१–२२ साठीचा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक प्रणालीने पाठवला जाईल. वरील सदर कागदपत्रे कंपनीच्या www.hbgindia.com या संकेतस्थळावर /आणि स्टॉक एक्स्चेंजच्या् .लीशळपवळर.लो या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रकानुसार एजीएम नोटीस आणि वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रती कोणाही भागधारकास पाठवल्या जाणार नाहीत.
ईमेल पत्ता नोंदणीकृत करणे व अपडेट करण्याची पद्धत :
अ) भौतिक प्रणालीने कंपनीचे भाग धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत करण्यासाठी फोलिओ क्र., सदस्याचे नाव (नावे) आणि पॅन कार्ड वा आधार कार्डाची स्व–साक्षांकित स्कॅन प्रत अशी आवश्यक कागदपत्रे जोडलेली ईमेल complaince@hbgindia.com/ prafuls@adroitcorporate.com /sandeeps@@adroitcorporate.com या ईमेलवर मेल करावीत.
ब) डिमॅट प्रणालीने भाग धारण केलेल्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत करण्यासाठी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटला संपर्क करावा, अशी विनंती आहे.
एजीएमच्या नोटीसीत दिलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान करण्यासाठी कंपनीच्या भागधारकांना ई–मतदान सुविधा (रिमोट ई–व्होटिग)कंपनीने पुरविली आहे. त्याशिवाय, एजीएम दरम्यान ई–मतदानाने (ई–व्होटिंग) मतदान करण्यासाठीची सुविधा कंपनीने दिली आहे. इलेक्ट्रॉनिक प्रणाली/भौतिक प्रणालीमध्ये रिमोट ईव्होटिंग आणि कंपनीचे भाग धारण करणाऱ्या भागधारकांना एजीएम दरम्यान ई–मतदानासाठीची पद्धत एजीएम नोटीशीत पुरविली जाईल.

**फिनिक्स टाऊनशीप लिमिटेडकरिता**
**सही/–**
**समित प्रफुल्ल हेदे**
**व्यवस्थापकीय संचालक**

**ठिकाण :मुंबई**
**दिनांक : ०१ सप्टेंबर २०२२**


# आमदार दिगंबर कामत यांच्या निवासस्थानी गणेशपूजा


**मडगाव: मडगावात आपल्या निवासस्थानी सहकुटुंब श्री गणेश चतुर्थी साजरी करताना आमदार दिगंबर कामत**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १ :** मडगावचे आमदार तथा माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी सहकुटुंब आपल्या मडगावातील निवासस्थानी श्री गणेश चतुर्थी साजरी केली. सकाळी विधीवत श्री गणेश पूजन केले. त्यानंतर आरत्या, तीर्थप्रसादही झाला. आमदार दिगंबर कामत, पत्नी सौ. आशा कामत, पुत्र योगिराज, स्नूषा सौ.स्नेहा व नातवंडे राधा व रुना सहभागी झाले होते.

# पारदर्शी पद्धतीने नोकरभरती : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** राज्यात बेरोजगारीची संख्या वाढत असल्याचा आरोप भाजप सरकारवर गेली अनेक वर्षे होत आहे. सरकारी नोकऱ्यांचे आमिष दाखवून केवळ भाजपने राजकारण केल्याचा आरोप वारंवार आजही विरोधकांकडून होत आहे. मात्र आता मुख्यमंत्री सावंत यांनी दावा केला आहे की, इतर राज्यांप्रमाणे गोव्यातही सरकारी नोकरी कर्मचारी भरती आयोगातर्फे होणार आहे.

यापुर्वी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी राज्यात १०००० सरकारी नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते मात्र त्यांनी तसे न केल्याचे वेळेनुसार स्पष्टही झाले. बेरोजगारी विषय यावेळी पावसाळी अधिवेशनातही गाजला आहे. विरोधकांनी सरकारला कोळसा विषयावर जाब विचारला तसेच नोकरी संदर्भातही सरकारलपा धारेवर धरले.


**हरमल : सार्वजनिक गणेशोत्सवात गायक सुभाष परवार गाताना. सोबत सुनाद कोरगावकर, तुकाराम गोवेकर, सागर पेडणेकर, अभी परवार.**

# हरमल गणेशोत्सवात गायनाने रसिक मंत्रमुग्ध

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** येथील सार्वजनिक गणेशोत्सवात मंडळाच्या २९ व्या उत्सवाच्या पहिल्या दिनी अर्जुन कलाविष्कारतर्फे गायक सुभाष परवार यांचा गायन कार्यक्रम झाला.

प्रारंभी 'श्री गजानन', 'संताचिया दारी, 'नभासही आले, 'पंढरीचे सुख, 'जयशंकरा करुणाकरा, 'विठ्ठल सोयरा, 'नाही पुण्याची बोलणी, 'टाळ वाजे ओवी सुचे, 'हरी भजनाविणा,' या भवनातील गीत, 'अबीर गुलाल' व 'कैवल्याच्या चांदण्याला' भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यांना सुनाद कोरगावकर (हार्मोनियम), तुकाराम गोवेकर (तबला), सागर पेडणेकर (मंजिरी) व अभी परवार (गायक–कोरस)यांनी साथसंगत केली.

# वास्कोतील कचरा संकलन केंद्र ठरतेय डोकेदुखी!

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १ :** येथील कचरा संकलन केंद्रे लाभदायक ठरण्याऐवजी डोकेदुखी ठरू लागली आहेत. त्यामुळे ती निर्जनजागी हलवावी किंवा तेथे जे कचरा टाकतात त्यांच्याविरोधात कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नगरसेवक दीपक नाईक व उपनगराध्यक्ष अमेय चोपडेकर यांनीही आपल्या प्रभागांतील काही कचरा संकलन केंद्रे तेथून हलिवण्याची गरज व्यक्त केली आहे.

मुरगाव पालिकेने दारोदार कचरा गोळा करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. दारोदार गोळा केलेला कचरा पूर्वी कचरावाहू वाहनांतून सडा येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये नेण्यात येत होता. परंतू त्यामुळे वेळेचा अपव्यय होत असेच शिवाय कचरा पूर्णपणे वाहून नेताना अडचणी उभ्या राहत होत्या. त्यामुळे ठिकठिकाणी गोळा करण्यात आलेला कचरा तेथेच संकलन करण्यासाठी कचरा संकलन केंद्रे बांधण्यात आली. यामुळे दारोदार कचरा गोळा करणारया कामगारांची सोय झाली. गोळा करण्यात आलेल्या कचऱ्यासह कचरा पेट्या संकलन केंद्रामध्ये ठेवण्यात येऊन केंद्राला कुलुप लावण्यात येते. मात्र, संकलन केंद्रांना कुलुपे लावण्यात आली असली तरी बरेच नागरिक आपला कचरा संकलन केंद्राच्या बाहेर टाकतात. काहीवेळा संकलन केंद्रामध्ये पेट्या ठेवण्यासाठी जागाच नसते तेव्हा सदर कामगार कचरयाने भरलेल्या पेट्या केंद्राच्या बाहेरच ठेवतात. संकलन केंद्राच्या बाहेर जमा झालेल्या या कचरयातील अन्नपदार्थ खाण्यासाठी तेथे भटकी गुरे जमून कचरा रस्त्याभर करतात. त्यामुळे परिसर गलिच्छ दिसतो. शिवाय वाहनचालकांना कचरा व भटक्या गुरांचा त्रास सहन करावा लागतो.

साईनगर, शांतीनगर येथे असलेल्या कचरा संकलन केंद्रामुळे वाहनचालक व नागरिकांना दुर्गंधी सहन करावी लागते. साईनगर येथील कचरा संकलन केंद्रामध्ये वास्कोबाहेरील काही चिकन विक्रेते चिकनाचे टाकाऊ गोष्टी तेथे टाकतात. त्यामुळे तेथे दुर्गंधी पसरते. त्यामुळे सदर कचरा संकलन केंद्र तेथून हलविण्यासाठी आपले प्रयत्न असेल असे स्थानिक नगरसेवक व उपनगराध्यक्ष चोपडेकर यांनी स्पष्ट केले. तीच गोष्ट बायणा मासळी मार्केटासमोरच्या रस्त्याकडेला उभारण्यात आलेले कचरा संकलन केंद्राची आहे.तेथे मोठ्या प्रमाणात कचरा जमा होतो. शिवाय नागरिक टाकाऊ वस्तूंही तेथे टाकतात. एकंदर सदर केंद्र नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू लागले आहे .या केंद्रामुळे तेथील रस्त्याची रूंदीही कमी झाली आहे. तेथे नेहमी दुर्गंधी पसरलेली असते. त्यामुळे सदर रस्त्याने ये–जा करण्याचे नागरिक टाळू लागले आहेत. सदर संकलन केंद्र तेथून हलिवण्यात येणार असल्याचे स्थानिक नगरसेवक दीपक नाईक यांनी स्पष्ट केले.

संकलन केंद्राबाहेर कचरा टाकल्याने परिसर अस्वच्छ होतोच शिवाय कचरा गोळा करणारया तो कचरा परत गोळा करताना काही अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे संकलन केंद्रासमोर सीसीटिव्ही कॅमेरा लावण्याचा प्रस्ताव होता. त्याचप्रमाणे संकलन केंद्राबाहेर कचरा टाकणारयाविरोधात कारवाई करताना त्यांना दंड ठोठावण्यात येणार असल्याचे मुरगाव पालिकेतर्फे जाहीर करण्यात आले होते. परंतु सदर प्रस्ताव व कारवाईचा इशारा अद्याप प्रत्यक्षात आलेले नाहीत.


**वास्को : साईनगर येथील कचरा संकलन केंद्र.** (अक्षदा राणे)


## जाहीर सूचना

**ICICI Bank**

**शाखा कार्यालय :** आयसीआयसीआय बँक लि., गाळा क्र. २०१–बी, २रा मजला, रस्ता क्र. १, प्लॉट क्र. बी–३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र–४००६०४

खालील कर्जदार/कर्जदारांनी या बँकेकडून घेतलेल्या कर्ज सुविधेची मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये बुडवेगिरी केली आहे आणि हे कर्ज कार्यरत नसलेली मत्ता (नॉन परफॉर्मिंग असेट्स–एनपीए) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहे. सदर कर्जदारास त्याच्या मागील ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट–२००२ च्या कलम १३(२) खाली एक नोटीस पाठवण्यात आली, तथापि तिची कार्यवाही झाली नाही व म्हणून याद्वारे या जाहीर सूचनेद्वारे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदार/सह–कर्जदार/हमीदार/(कर्जखाते क्रमांक) आणि पत्ता | सुरक्षित मत्ता/अंमलबजावणी करण्याची मत्तेचा मालमत्ता पत्ता | पाठवलेल्या नोटीशीची तारीख/नोटीस तारखेला देय रक्कम | एनपीए तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | मे. नॉर्बर्ट फिटनेस स्टुडिओ/नॉर्बर्ट एझेक्रील डी सौझा/श्रीमती शेरील एलिझाबेथ अफोन्सो ई डिसौझा/नॉर्बर्ट फिटनेस स्टुडिओ, गाळा क्र. जी–५, सांतिनेज, अमेया बिल्डींग, पणजी – उत्तर गोवा, गोवा पणजी–४०३००१ / १६७८०५०००२०९ | फ्लॅट क्र. बी–४०१, चवथा व पाचवा मजला, एस्मेराल्डा कासा दी पोवो, प्लॉट क्र. ११८/७, ताळगाव, तिसवाडी तालुका, गोवा ४०३००१ | ०३ ऑगस्ट, २०२२ रु. १६,७८,४३१.६५/– | ३१/०५/२०२२ |

नोटीशीची पर्यायी सेवा देण्याकरिता पावले उचलली आहेत. वरील कर्जदार आणि/ किंवा त्यांचे हमीदार (लागू असेल तसे) यांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत दय रकमेचा भरणा करावा अन्यथा सिक्युरिटायझशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट–२००२ मधील तरतुदींनुसार पुढची पावले उचलली जातील.

**दिनांक : ०२ सप्टेंबर २०२२**
**ठिकाण : गोवा**

**प्राधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय बँक लिमिटेड**